# बैठकीचे इतिवृत्त

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/ शिक्षण-१ दि.१३.१२.२०२२ अन्वये ए.एन.एम., जी. एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी “शिक्षण शुल्क समिती” गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दि. १५.०५.२०२६ रोजी आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई, यांच्या दालनात सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत खालील अधिकारी उपस्थित होते:-

१) संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ ,मुंबई.
२) उप सचिव तथा सदस्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई.
३) अधिक्षिका, शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.
४) प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ मुंबई.
५) श्री. कैलास गांधी निमंत्रित सनदी लेखापाल
६) श्रीमती. वैशाली बापट निमंत्रित परिव्यय लेखापाल

उपरोक्त बैठकीत उपस्थित मुद्ये व त्यावरील देण्यात आलेले निर्देश पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र | मुद्या | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | मागील बैठकीत सादर शै.व. २०२५-२६ च्या शिक्षण शुल्क प्रस्तावांचे पुनर्विलोकन १ (REVIEW) शुल्क मंजुरीबाबत. | शै.व.२०२५ - २६ च्या शिक्षण शुल्क प्रस्तावांचे १ पुनर्विलोकन करण्यासाठी आलेल्या संस्थाप्रमुख (प्रतिनिधिचे) शेरे लक्षात घेऊन व त्रुटि संदर्भातील सर्व कागदपत्राचा अभ्यास करून खालील प्रमाणे निर्णय घेतला गेला आहे . | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

**पुनर्विलोकनREVIEW A.Y.२०२५-२६**

**ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रम**

| Sr No. | Institute code | Institute Name | Stream | Tuition Fee | Development Fee | Final Fee for A.Y. २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ००५३ | डॉ.जे.जे. मगदुम स्कूल ऑफ नर्सिंग, शिरोळ, कोल्हापूर | GNM | ५५२०३ | ५७९७ | ६१००० |

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| २ | शै.व. २०२५-२६ च्या शिक्षण शुल्क प्रस्तावांचे पुनर्विलोकन २ (REVIEW) शुल्क मंजुरी चर्चेबाबत. | १. ०९०२ वामनराव इथापे आर जी. एन. एम स्कूल, संगमनेर, अहमदनगर - GNM<br>मागील वर्षाचे शुल्क - रु ७००००/-<br>२०२५-२६ चे मंजूर शुल्क - रु ७३५००/-<br>सदर संस्थेच्या प्रतिनिधींनी सिस्टम द्वारे येणारे शुल्क जास्त असल्याकारणाने समितीने दिलेल्या ५% शुल्कवाढी ऐवजी कमीत कमी १०% वाढ देण्याची विनंती समितीसमोर केलेली आहे.<br><br>२. ०२११ पुणा हॉस्पिटल रिसर्च सेंटर , स्कूल ऑफ नर्सिंग, पुणे - GNM<br>मागील वर्षाचे शुल्क - रु ३५०००/-<br>२०२५-२६ चे मंजूर शुल्क - रु ३५०००/-<br>सदर संस्थेच्या प्रतिनिधींनी आपले सर्व खर्च हॉस्पिटलच्या अकाऊंट मधून झालेले मान्य केलेले असून आपल्या झालेल्या खर्चाचे सर्व कागदपत्रे समितीसमोर सादर करून काही वाढ देण्याची विनंती समितीसमोर सादर केलेली आहे.<br>शै.व.२०२५-२६ च्या शिक्षण शुल्क प्रस्तावांचे २ पुनर्विलोकन करण्यासाठी आलेल्या संस्थाप्रमुख (प्रतिनिधींचे) शेरे लक्षात घेऊन व त्रुटि संदर्भातील सर्व कागदपत्राचा अभ्यास करून पुढील बैठकीत निर्णय दिला जाईल , असे सर्वानुमते ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ३. | शै.व. २०२५-२६ च्या Upward Revision प्राप्त झालेल्या संस्थांचे प्रस्ताव शुल्क मंजुरीसाठी सादर. | शै.व. २०२५-२६ Upward Revision प्राप्त झालेल्या संस्थांचे शिक्षण शुल्क प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात आले . | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती

Upward Revision A.Y.२०२५ - २६

ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रम

| Sr No | Institute code | Institute Name | Stream | Tuition Fee | Development Fee | Final Fee for A.Y.२०२५ - २६ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ०२०१ | इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन , डोंबिवली | ANM | ३०७१३ | ३२८७ | ३४००० |
| २. | ०२०१ | इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन , डोंबिवली | GNM | ३७०३६ | ३९६४ | ४१००० |
| ३. | ०६३८ | सरदारबी इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, मोहोळ, सोलापूर, | ANM | ५०६७९ | ५३२१ | ५६००० |
| ४. | ०६३८ | सरदारबी इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, मोहोळ, सोलापूर, | GNM | ४८८६९ | ५१३१ | ५४००० |
| ५. | ०६५० | यश इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग पॅरामेडिकल सायन्सेस, इंदापूर, पुणे | ANM | ३५१३५ | ३८६५ | ३९००० |
| ६. | ०६५० | यश इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग पॅरामेडिकल सायन्सेस, इंदापूर, पुणे | GNM | ४८६४७ | ५३५३ | ५४००० |
| ७. | ०६६४ | मदर तेरेसा नर्सिंग अकॅडमी , बल्लारपूर, चंद्रपूर | ANM | १९०९१ | १९०९ | २१००० |
| ८. | ०९९४ | महात्मा फुले नर्सिंग स्कूल, अकोला | GNM | २७२७४ | २७२६ | ३०००० |
| ९. | ११८६ | श्रीराम इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग, पणिव | ANM | ३५४५४ | ३५४६ | ३९००० |
| १०. | ११८६ | श्रीराम इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग, पणिव | GNM | ४२७२७ | ४२७३ | ४७००० |
| ११. | १२७१ | राष्ट्रमाता जिजाऊ नर्सिंग कॉलेज भंडीशेगाव ता.पंढरपूर | ANM | २७१४९ | २८५१ | ३०००० |
| १२. | १२९२ | अशोका नर्सिंग कॉलेज, कोसारा, चंद्रपूर. | GNM | ३०९०९ | ३०९१ | ३४००० |

| अ.क्र | मुद्या | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय |
|---|---|---|---|
| ४. | बँक खाते उघडण्याकरीता आवश्यक सदस्यांच्या निवडीबाबत. | बँक खाते उघडण्याकरीता अध्यक्ष व एक सदस्य यांच्या नावाची निवड सदर बैठकीत करण्यात आली व यांच्या स्वाक्षरीने बँक खात्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी.<br>१. श्री.अनिल भंडारी,(आयुक्त) वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई तथा अध्यक्ष शिक्षण शुल्क समिती<br>२. श्रीमती अर्चना बढे (शुश्रुषा अधिक्षिका), वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई तथा सदस्य शिक्षण शुल्क समिती | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ५. | शै.व. २०२६-२७ च्या शिक्षण शुल्क समितीच्या मानकांच्या मंजूरीबाबत. | शिक्षण शुल्क समितीच्या सदस्यांनी शै.व. २०२६-२७ च्या मानकांचा अभ्यास करून त्याबाबतचा मसुदा पुढील बैठकीत सादर करावा असे मा. अध्यक्ष यांनी सूचित केले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ६. | शै.व. २०२६-२७ च्या शुल्क मंजूरीच्या वेळापत्रक प्रक्रियेबाबत चर्चा व मंजूरी. | शै.व. २०२६-२७ च्या शुल्क मंजूरीच्या वेळापत्रक प्रक्रियेबाबत खालीलप्रमाणे ठरविण्यात आले .<br>दि.०१/०६/२०२६ ते १५/०७/२०२६ (४५ दिवसासाठी) ऑनलाइन पोर्टल सुरू करण्याचे ठरविण्यात आले . | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ७. | शै.व.२०२६-२७ साठी Ad hoc Fee मंजुरीबाबत. | शै.व.२०२६-२७ साठी नवीन संलग्नित संस्थाचे तदर्थ (Ad-hoc) शैक्षणिक शुल्क खालीलप्रमाणे सर्वसहमतीने ठरविण्यात आले आहे.<br>१. ए. एन.एम अभ्यासक्रमासाठी रु. ४५०००/-<br>[रु.४०७२४ /- (Tuition fee) + रु.४२७६/-(Development Fee)]<br>२. जी. एन.एम अभ्यासक्रमासाठी रु. रु. ५००००/-<br>[रु.४५२४९/- (Tuition fee) + रु.४७५१/- (Development Fee)]<br>३. Post Basic Diploma Oncology Nursing & Post Certificate Diploma in Psychiatric Nursing रु.६००००/-<br>[रु. ५४,२९९/- (Tuition fee) + ५,७०१ (Development Fee)] | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय |
|---|---|---|---|
| ८. | “कारणे दाखवा नोटिस”बजाविलेल्या संस्थांच्या शुल्क मंजुरीबाबत. | शै. व. २०२५-२६ करीता शुल्क मंजूरीसाठी प्रस्ताव दाखल केलेल्या व समितीने “कारणे दाखवा नोटिस”बजाविलेल्या संस्थांचा प्राप्त स्वयंस्पष्ट खुलासा विचारात घेऊन लेखापाल यांनी कॅलक्युलेशन करून पुढील बैठकीत शुल्क मंजुरीकरीता सादर करावे असे मा.अध्यक्ष यांनी सूचित केले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

समितीची पुढील बैठक आयुक्त तथा अध्यक्ष यांच्या आदेशानुसार सूचित करण्यात येईल. उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

प्रबंधक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक
शिक्षण मंडळ तथा सदस्य

अधिक्षिका,
शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन,
तथा सदस्य

संचालक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक
शिक्षण मंडळ तथा सदस्य

उप सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
तथा सदस्य सचिव

आयुक्त (वैद्यकीय शिक्षण),
तथा अध्यक्ष